नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी
निशाणी क्र. १३



**<u>साक्षीदार क्र.०१ सचिन गोवर्धन आठवले यांचा उलटतपास आरोपी क्र. ४ ते ६ तर्फे वकील श्रीमती. जे. एच. शेंडे यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

१२. **हे म्हणणे खरे आहे की,** मी जप्त मुद्देमाल सिल केला नाही. **हे म्हणणे खरे आहे की,** पोस्टमोर्टम रिपोर्ट च्या आधारावर मी फिर्याद नोंदविलेली नाही. फॉरेन्सीक लॅब मध्ये मय्यत वाघाच्या आतील अव्वयय पाठविले आहे व त्याचा अहवाल अजुन प्राप्त झाला नाही. **हे म्हणणे खरे आहे की,** खाजगी शेतापासुन नाला लागुन आहे. त्यामध्ये येण्या-जाण्याचा रस्ता नाही. त्यामध्ये धुरा आहे पण रस्ता नाही. **हे म्हणणे खरे आहे की,** ज्याने फोन करुन मृत वाघा बद्दल माहिती दिली त्याला साक्षीदार केले नाही. सदर केस मध्ये ११ साक्षीदार वन विभागाचे आहेत. **हे म्हणणे खरे आहे की,** ज्या ठिकाणी वाघ मृत होता त्याचे जि.पि.एस. लोकेशन मी सांगु शकत नाही. **हे म्हणणे खरे आहे की,** रानडुकराच्या शिकार केलेल्याचे ठिकाण चे लोकेशन मी सांगु शकत नाही. **हे म्हणणे खरे आहे की,** आरोपीने मृत वाघापासुन काय नफा मिळविला याचे कागदपत्र केस मध्ये जोडलेले नाही. **हे म्हणणे खरे नाही की,** आरोपींनी कोणताही गुन्हा केला नाही. **हे म्हणणे खरे नाही की,** सरतपासातील मजकुर खोटा आहे व आज मी खोटी साक्ष देत आहे. **हे म्हणणे खरे नाही की,** मृत वाघाची दुस-या वाघासोबत झुंज झाल्याने मृत वाघाने त्याचे अव्वयय गमविले आहे व तो मैय्यत झाला आहे. **हे म्हणणे खरे आहे की,** प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षदार नाही. **हे म्हणणे खरे आहे की,** आरोपींनी यापुर्वी तसकरी केल्याबाबत मी कागदपत्र जोडले नाही. **हे म्हणणे खरे नाही की,** मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी
निशाणी क्र. १३

**आरोपी क्र. ४ ते ६ तर्फे उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**आरोपी क्र. १ ते ३ तर्फे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

SONPARI MAHENDRA GADE

Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2025.12.06 12:29:22 +0530

सावनेर. (एस. एम. गाडे)

दिनांक ०४.१२.२०२५ **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**

(न्यायालय क्र.०३) सावनेर